।। उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।।

नॅक पुनर्मूल्यांकन श्रेणी 'ब' (सीजीपीए २.६८)
विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली घोषित
*'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स'*

# पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे
# सजन इसन पाटील कला, गिरधर बारकू पटेल विज्ञान व शहादा तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ वाणिज्य महाविद्यालय, शहादा, (जि. नंदुरबार), (महाराष्ट्र-४२५ ४०९).

**दूरध्वनी: (०२५६५) २२९५७६, २२९०७६,** **फॅक्स:(०२५६५)२२९५७६,**

**संकेतस्थळ: http://www.psgvpasc.ac.in** **ई-मेल: principal.shahada@gmail.com**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न**

**स्थापना: १९७०**

**पदवी आणि पदव्युत्तर वर्गांसाठी**




**माहिती पत्रक : २०१२-१३**

## वरिष्ठ महाविद्यालय : प्राचार्य व प्राध्यापक - कला शाखा

### हिंदी विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | मा.प्राचार्य डॉ.विश्वास पाटील, विभाग प्रमुख | एम.ए.,पी-एच्.डी. |
| २ | प्रा.डॉ. गौतम कुवर | एम.ए.,पी-एच्.डी. |

### इंग्रजी विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.एस.डी.सिंदखेडकर, उपप्राचार्य व विभाग प्रमुख | एम.ए.,पी-एच्.डी.(इंग्रजी) |

### मराठी विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.श्रीमती एस. व्ही. पाटील, विभाग प्रमुख | एम.ए., बी.एड्.,एम.फिल., पी-एच्.डी. |
| २ | प्रा. जीवन जगदाळे | एम.ए. |

### भूगोल विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा. जी. एस. खंडागळे, विभाग प्रमुख | एम.ए., बी.एड्., एम.फिल. |
| २ | प्रा. एम. एम. पाटील | एम.एस्सी., बी.एड्., एम.फिल. |
| ३ | प्रा. जे. व्ही. भारती | एम.ए., एम.एड्. |
| ४ | प्रा.डॉ. यू. व्ही. निळे | एम.ए.,पी-एच्.डी. |
| ५ | प्रा. पी. आर. तोरवणे | एम.ए., सेट |

### अर्थशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.ए.आर.निकम, विभाग प्रमुख | एम.ए., एम.फिल., पी-एच्.डी., सेट |
| २ | प्रा. एस. एल. भालेराव | एम.ए., नेट |
| ३ | प्रा. एस. एस. पवार | एम.ए., सेट |

### इतिहास व राज्यशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.बी. एस.रामटेके, विभाग प्रमुख | एम.ए., एम.फिल. |
| २ | प्रा. डॉ. डी. डी. निकुंभ | एम.ए., बी.एड्., एम.फिल.,पी-एच्.डी. |
| ३ | प्रा. वाय. के. शिरसाठ | एम.ए. |

### मानसशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.एन. के. कुलथे, विभाग प्रमुख | एम.ए., एम.फिल. |

### वाणिज्य शाखा

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.आर. एल. तोतले, विभाग प्रमुख | एम.कॉम., एम.फिल. |
| २ | प्रा. डी. एम. गांगुर्डे | एम.कॉम. |

### क्रीडा विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.ए. आर. कांबळे, क्रीडा संचालक | एम.पी.एड्., सेट |

### ग्रंथालय विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.बी. एस. पाटील, ग्रंथपाल | एम.ए., बी.लिब. सायन्स, एम.फिल. |

।। उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।।

नॅक पुनर्मूल्यांकन श्रेणी 'ब' (सीजीपीए २.६८)
विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली घोषित
*'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स'*

# पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे
# सजन इसन पाटील कला, गिरधर बारकू पटेल विज्ञान व
# शहादा तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ वाणिज्य महाविद्यालय,
# शहादा, (जि. नंदुरबार), (महाराष्ट्र-४२५ ४०९).

महाराष्ट्राच्या उत्तर टोकाला सातपुड्याच्या पायथ्याशी तापी आणि गोमाईच्या सान्निध्यात शहादे शहर वसलेले आहे. मध्य प्रदेश आणि गुजरातच्या सीमांना स्पर्श करणारी ही सुजलाम-सुफलाम भूमी भारतीय स्वातंत्र्याच्या काळापासून त्याग आणि बलिदानासाठी अग्रेसर आहे. स्वातंत्र्य सेनानी आदरणीय श्री. अण्णासाहेब पी. के. पाटील यांनी १९४२ च्या 'चले जाव' लढ्यात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. कारावास झेलला. दि.२९ डिसेंबर १९६९ रोजी त्यांनी पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाची स्थापना केली. त्यांच्या गतीशील नेतृत्वामुळे संस्था भरभराटीला आली. १९७०-७१ मध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सुरू झाले. हा शैक्षणिक परिसर 'महात्मा गांधी विद्याश्रम परिवार' या नावाने परिसरात परिचित आहे. आमची ही भूमी नित्य इयत्ता ओलांडणारी भूमी आहे. आमच्या शिक्षण संकुलात अठरापगड समाज पुरूष ज्ञान साधना करतो.

या महाविद्यालयात ११ वी १२ वी पासून कला(इंग्रजी, हिंदी, मराठी, अर्थशास्त्र, इतिहास आणि भूगोल), विज्ञान (वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, गणित, संगणकशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान) आणि वाणिज्य विषयक पदवी शिक्षणाची उत्तम सोय आहे. पदव्युत्तर विभागात कला शाखेत (इंग्रजी, हिंदी, मराठी, अर्थशास्त्र आणि भूगोल) विज्ञान विभागात (वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र) आणि वाणिज्य विषयातील पदव्युत्तर शिक्षणाची उत्तम सोय आहे. एम्.फिल्., पी-एच्.डी. या संशोधनपर पदव्या प्राप्त करण्याची सोय महाविद्यालयात उपलब्ध आहे. ***महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे संशोधन मान्यता प्राप्त आहेत.***

**महाविद्यालयाचा परिसर :**

- निसर्ग सन्मुख प्रसन्न परिसर
- प्रशस्त आणि अद्ययावत वास्तू
- विविध सोयी-सुविधांनी युक्त भव्य क्रीडांगण
- उत्तम छात्रालय
- समृध्द ग्रंथालय
- दुर्मिळ वनस्पती उद्यान
- 'हृदय कुंज' महात्मा गांधी कुटी

**विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र सुविधा:**

- ग्रंथ पेढी योजनेद्वारा वर्षभर पाठ्यपुस्तकांचा संच भेट
- स्वतंत्र बसची व्यवस्था
- ग्रंथालयात स्वतंत्र अध्ययन कक्ष
- युवतीसभेद्वारा व्यक्तिमत्व विकासासाठी व्यक्तिगत मार्गदर्शन
- आरोग्य, शारीरिक-मानसिक विकास, मानवी हक्क, नोकरी आणि सेवेसंबंधी सुविधांबाबत मार्गदर्शन
- विविध क्षेत्रातील प्रागतिक आणि मान्यताप्राप्त महिलांचे मार्गदर्शन

**सांस्कृतिक शिक्षण:**

- पाठ्यक्रमाच्या अभ्यासासोबत विद्यार्थ्यांच्या विविध कला-गुणांचा विकास
- व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगिण विकासाची योजना
- कला, छंद आणि कृतिशीलता जोपासून विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास
- वक्तृत्व, संस्कृती, कला-नाट्य, शैक्षणिक सहल या उपक्रमांवर भर
- विद्वान वक्त्यांची भाषणे, अभ्यास वर्ग, कार्यशाळा, चर्चासत्र
- नवलेखकांसाठी मार्गदर्शक शिबीराचे आयोजन
- महात्मा गांधी विचार मंथन सप्ताह (दि.२ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर)

**केन्द्रीय ग्रंथालय:**

- अद्ययावत इमारत आणि समृध्द ग्रंथ संपदा
- दुर्मिळ ग्रंथ, ई बुक्स आणि नियतकालिकांचा संग्रह
- क्रमिक आणि शोध संदर्भ ग्रंथ संख्या: ९८०९६
- नियतकालिकांची संख्या: ८०
- प्राध्यापक व संशोधकांसाठी स्वतंत्र अध्ययन कक्ष
- विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अध्ययन कक्ष
- पदव्युत्तर आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी दृक्-श्राव्य केन्द्र
- सर्व विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट संगणकीकृत ग्रंथालय

**ग्रंथालय आणि अभ्यासिकेसंबंधी नियम आणि अटी:**

- ग्रंथालयात प्रवेश करताना ओळखपत्र अनिवार्य
- ग्रंथालयात भ्रमणध्वनी संच बंद ठेवावा
- विविध वर्गांसाठी ठरलेल्या दिवशी आठवड्यातून एकदा पुस्तक बदलता येईल
- पदवीस्तरीय विद्यार्थ्यांना एका वेळी एक तर पदव्युत्तर विद्यार्थ्यांना एका वेळी दोन पुस्तके मिळतील
- ग्रंथालयात नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे

**ग्रंथ पेढी योजना:**

- गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना ग्रंथपेढी योजनेतून पाठ्यपुस्तक संच विनामुल्य उपलब्ध,
- कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना या सोयीचा लाभ

**महात्मा गांधी अध्ययन केन्द्र:**

- यूजीसी, नवी दिल्ली पुरस्कृत महात्मा गांधी अध्ययन केन्द्र
- अभ्यासू जनांसाठी निसर्ग सान्निध्यात उभारलेली *'हृदय कुंज'* - महात्मा गांधी कुटी
- महात्मा गांधींच्या हस्ताक्षरातील *'हिंद स्वराज्य'* हा ग्रंथ
- महात्मा गांधींचे समग्र वाङ्मय हिंदी, मराठी व इंग्रजीत उपलब्ध
- विविध अभ्यास वर्ग, कार्यशाळा, चर्चासत्रांचे आयोजन
- दररोज प्रात:कालीन सर्व धर्म प्रार्थनेचे आयोजन

**बॉटनीकल गार्डनः**

- यूजीसी, नवी दिल्ली पुरस्कृत
- ग्रीन हाऊस
- पॉली हाऊस
- नष्टप्राय-दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन
- औषधी वनस्पतींचे संवर्धन

**वसतीगृहः**

- निसर्गरम्य परिसरात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या स्वतंत्र वसतीगृहाची सुविधा
- विद्यार्थ्यांच्या निवास आणि भोजनाची यूजीसी वसतीगृहात अत्यल्प दरात सोय
- एकूण ६०० विद्यार्थ्यांचा अंतर्भाव असलेले वसतीगृह
- विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतीगृह
- एकूण ४०० विद्यार्थिनींचा अंतर्भाव असलेले वसतीगृह
- वसतीगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो
- वसतीगृहाची नियमावली स्वतंत्रपणे रेक्टरकडे उपलब्ध
- वसतीगृहात सायंकालीन सर्व धर्म प्रार्थना

**एकलव्य वसतीगृहः**

- १२० विद्यार्थ्यांच्या निवासाची सशुल्क सोय
- वसतीगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.
- वसतीगृहाची नियमावली स्वतंत्रपणे रेक्टरकडे उपलब्ध
- वसतीगृहात सायंकालीन सर्व धर्म प्रार्थना

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केन्द्रः**

- मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली चर्चासत्रे, कार्यशाळा आणि व्याख्यानांचे आयोजन
- एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी २००९-१० पासून यूजीसी, नवी दिल्ली पुरस्कृत विशेष अध्ययन-अध्यापनाची सुविधा-
    - रेमेडियल प्रशिक्षण वर्ग
    - नेट-सेट परीक्षांसाठी मार्गदर्शन वर्ग
    - विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन वर्ग

**क्रीडा संकुल आणि क्रीडांगण:**

- महाविद्यालयाच्या आवारात प्रशस्त अद्ययावत विविध सोयी-सुविधांनी युक्त क्रीडांगण
- विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्रपणे व्यायामशाळा उपलब्ध
- विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालय सातत्याने विजेतेपदाचे मानकरी
- उमविच्या विविध आंतर-महाविद्यालयीन व विभागीय क्रीडा स्पर्धांचे यजमानपद
- खो-खो, कबड्डी, क्रीकेट, बॅडमिन्टन, टेबल-टेनीस, बास्केट बॉल, व्हॉली बॉल, बेस बॉल, फूट बॉल, हॉकी यासारख्या देशी-विदेशी खेळांची व्यवस्था
- सुसज्ज क्रीडा संकुलाची उभारणी
- ४०० मिटर ग्रासी रनींग ट्रॅकची सोय
- वैयक्तिक आणि सांघिक खेळाडूंसाठी प्रशिक्षण आणि उत्तेजन

**राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी):**

- भारत सरकार संरक्षण खात्याच्या योजनेनुसार महाविद्यालयात एनसीसी कार्यरत
- शारीरिक-मानसिकदृष्ट्या सुदृढ विद्यार्थी-विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ
- ५३ विद्यार्थी आणि ५३ विद्यार्थिनींना छात्र सेनेत प्रवेश

**राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस):**

- भारत सरकारच्या शिक्षण विभागाद्वारे पुरस्कृत व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ द्वारा स्वीकृत योजना.
- या योजनेमार्फत श्रमप्रतिष्ठित समुह जीवन, आत्मनिर्भर स्वावलंबन आणि समर्पित राष्ट्रीय भावनेचा विकास.
- २५० विद्यार्थी - विद्यार्थिनींना प्रवेश

**विद्यार्थी परिषद:**

- विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थी परिषदेचे गठन.
- गुणवत्तेनुसार वर्ग प्रतिनिधींची निवड.
- सर्व वर्ग प्रतिनिधींमधून एका विद्यापीठ प्रतिनिधीची निवड.
- विद्यार्थी परिषदेच्या सभासदांचा महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग.

**सातत्यपूर्ण मूल्यमापनः**

- चाचणी परीक्षा, स्वाध्याय, गृहपाठ, परिचर्चा, परिसंवाद इ.विविध मूल्यमापन पध्दतींचा वापर
- प्रथम आणि द्वितीय सत्रात चाचणी परीक्षांचे आयोजन
- सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा, समाज-सन्मुख कार्यपध्दती व शिक्षण विस्तार सेवेचे आयोजन

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित कर्मवीर भाऊराव पाटील कमवा-शिका योजनाः**

- स्वावलंबनातून श्रम-प्रतिष्ठेची स्थापना
- गरजू, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी अर्थ सहाय्य
- स्वयं-रोजगाराची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध
- अध्ययनवेळेव्यतिरिक्त वेळेत योजनेत सहभाग

**वार्षिक स्नेह-सम्मेलनः**

- विद्यार्थ्यांच्या कला गुणांच्या आणि विविध कौशल्यांच्या विकास आणि प्रकटीकरणाची संधी
- वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन

**संशोधन मान्यता प्राप्त प्रयोगशाळाः**

- अद्ययावत साधन-सुविधांनी युक्त विज्ञान विषयांच्या प्रयोगशाळा कार्यरत
- संगणक प्रयोगशाळा स्वतंत्रपणे उपलब्ध
- उमविद्वारा संशोधन मान्यताप्राप्त प्रयोगशाळा
- रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांच्या सुसज्ज प्रयोगशाळा

**शिष्यवृत्त्याः**

- विविध गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना अनेक सरकारी, निमसरकारी शिष्यवृत्त्या, शैक्षणिक सवलती प्रदान केल्या जातात.
- शिष्यवृत्तींसाठी असलेल्या निकषांची पूर्तता विद्यार्थ्यांकडून होणे अपेक्षित असते. असे निकष आणि शिष्यवृत्तीसाठी करावयाच्या अर्जाबाबत सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावल्या जातात.
- दि.५ जुलै २०१२ पर्यंत विद्यार्थ्यांनी विविध शिष्यवृत्त्यांच्या संदर्भात कार्यालयातून माहिती उपलब्ध करून घ्यावी.

- भारत सरकारची शिष्यवृत्ती
- भारत सरकारची फ्रीशिप
- राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

- अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी यूजीसी, नवी दिल्ली पुरस्कृत मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती
- एकलव्य योजना (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पुरस्कृत)
- महाराष्ट्र राज्य गुणवत्ता शिष्यवृत्ती
- प्राथमिक-माध्यमिक शाळेच्या पाल्यांना शिष्यवृत्ती
- अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

**अत्यंत महत्त्वाची टीप:**

- ***शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून भारत सरकार शिष्यवृत्तीची प्रक्रिया ऑनलाईन झाल्यामुळे शिष्यवृत्तीची सवलत घेणाऱ्या (सर्व मागासवर्गीय) विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाईन नोंदणी करून त्याची प्रिन्टेड कॉपी कार्यालयात शिष्यवृत्तीशी संबंधित लिपिकाकडे जमा करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी केल्यावर शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या बचत खात्यावर परस्पर जमा होते. त्यामुळे प्रवेश घेताना ( ओबीसी, एन.टी./व्हीजे, एसबीसी, एससी) विद्यापीठ शुल्क जमा करणे आवश्यक आहे.***
- ***विद्यार्थ्याच्या दिरंगाईमुळे त्याच्या बचत खात्यावर शिष्यवृत्ती जमा न झाल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित विद्यार्थीच जबाबदार राहील.***

**प्राध्यापक वृंद:**

- तज्ज्ञ, अनुभवी, कार्यक्षम आणि विद्यार्थी वर्गाबद्दल आस्थावान प्राध्यापक
- अतिरिक्त तासिकांद्वारे होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
- शिक्षक-पालक योजना

**बक्षिसे:**

- वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम दोन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे
- गरजू, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना सहाय्य निधीतून मदत मिळते
- सन १९९८-९९ पासून महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गात प्रवेश घेणाऱ्या ८०% पेक्षा अधिक गुणांनी इ.१२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना दरमहा ₹१००/- आणि ७५% पेक्षा अधिक गुणांनी इ.१२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना दरमहा ₹७५/- एवढी शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्षभर देण्यात येते. फेब्रु./मार्च २०१३ च्या १२ वी परीक्षेत उत्तीर्ण होणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी या बक्षिसासाठी पात्र ठरतात

- प्रथम वर्ष कला वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस ***'कृष्णांबरी'*** पारितोषिक
- 'अकौन्टन्सी' विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ***'श्रीमती मथुराबाई हेमचंद्र शहा'*** पारितोषिक
- वाणिज्य विभागात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस ***'सपना बनेचंद जैन'*** आदर्श विद्यार्थिनी पारितोषिक
- राष्ट्रीय छात्र सेना उत्कृष्ट नेमबाज विद्यार्थ्यास ***'कै.शरद मगन पाटील'*** पारितोषिक
- तृतीय वर्ष प्राणीशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्यास ***'लक्ष्मी-वल्लभ'*** पारितोषिक
- तृतीय वर्ष इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्यास ***'श्रीमती सरीबेन रामदास पटेल'*** पारितोषिक
- स्वावलंबी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ***'कमवा व शिका'*** योजना कार्यान्वित
- गरजू, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना एकलव्य विद्याधन योजना
- महाराष्ट्र राज्य व केन्द्र शासनाने जाहीर केलेल्या सवलती व शिष्यवृत्त्या विद्यार्थ्यांना मिळतात.

**महाविद्यालयात प्रवेश - नियम व अटी:**

महाराष्ट्र राज्य पुणे/नाशिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची **१२ वी** ची परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात प्रथम प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढील मूळ कागदपत्रे सादर करावीत.

१. काळ्या बॉल पेनने अचुक माहिती भरलेला छापील नमुन्याचा प्रवेश अर्ज.
२. रॅगींग न करण्यासंबंधीचे हमीपत्र (विद्यार्थी व पालकाचे)
३. पासपोर्ट आकाराचे नवीन काढलेले तीन रंगीत फोटो. (समोर पाहून फोटो काढावा.)
४. दहावीच्या गुणपत्रकाची फक्त एक झेरॉक्स प्रत.
५. बारावीचे मूळ गुणपत्रक + तीन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
६. बारावीचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला + तीन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
७. मूळ बोनाफाईड/कॅरेक्टर सर्टिफिकेट + दोन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
८. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीच्या दाखल्याची फक्त एक अटेस्टेड झेरॉक्स प्रत,
९. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची फक्त एक अटेस्टेड झेरॉक्स प्रत,
१०. प्रवेश घेताना भरावयाची संबंधित वर्गाच्या शुल्काची आवश्यक रक्कम.(फी-तक्त्यानुसार)
**११. सवलतीत प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्तीचा अर्ज करणे अनिवार्य आहे, अन्यथा संपूर्ण फी जमा करावी लागेल.**
१२. मान्य क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असतील तर मेरीटनुसार प्रथम येणाऱ्यास प्राधान्यक्रमाने प्रवेश दिला जाईल.

**(वरील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती स्वतःजवळ ठेवाव्या कार्यालयातून मागणी करू नये.)**

❖ महाराष्ट्र राज्य पुणे/नाशिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १२ वी परीक्षेव्यतिरिक्त इतर परीक्षा (उदा. डी.एड्.,राज्याबाहेरील बारावी, इ.) उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून पात्रता प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वंतत्र अर्ज करून सोबत पुढील कागदपत्रे जमा करणे अनिवार्य आहे.

१. दहावीच्या गुणपत्रकाची एक झेरॉक्स प्रत.
२. बारावीचे मूळ गुणपत्रक + तीन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
३. बारावीचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला + तीन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
४. मूळ बोनाफाईड/कॅरेक्टर सर्टिफिकेट + दोन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
५. स्थलांतर (मायग्रेशन) प्रमाणपत्र + तीन अटेस्टेड झेरॉक्स प्रती.
६. प्रवेश घेताना भरावयाची संबंधित वर्गाच्या शुल्काची आवश्यक रक्कम.
७. विद्यापीठाने निर्धारित केलेले पात्रता शुल्क.

**वर्तणुकीसंबंधी नियमः**

१. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र (आयडेन्टीटी कार्ड) सदैव धारण केले पाहिजे. ज्या वेळी मागणी केली जाईल त्या वेळी ते दाखविले पाहिजे. ओळखपत्राशिवाय ग्रंथालय अगर वर्गातील व्याख्यानांचा त्याला लाभ घेता येणार नाही. महाविद्यालयात शिकत असताना दरवर्षी ओळखपत्राचे नूतनीकरण आवश्यक आहे.

२. वाचनालयाची पुस्तके काळजीपूर्वक वाचून वेळेवर परत केली पाहिजेत. पुस्तकातील पाने जर गहाळ असतील तर पुस्तकाची मूळ किंमत व दंड आकारण्यात येईल.

३. वेळापत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांनी सर्व तासिकांना किमान ८०% उपस्थिती दिलीच पाहिजे. स्वाध्याय व अंतर्गत चाचणी परीक्षा सर्वांना बंधनकारक आहे. यात शारीरिक शिक्षण, एन.एस.एस. आणि एन.सी.सी. परेड्स् यांचाही समावेश होतो. महाविद्यालयातील तासिका किंवा अंतर्गत परीक्षांना अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षांना बसता येणार नाही.

४. महाविद्यालयातील फर्निचर खराब न करणे, सुव्यवस्थित राखणे याची दक्षता विद्यार्थ्याने घ्यावी.

५. एखाद्या विद्यार्थ्याने महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर गैरवर्तन केल्यास त्याला महाविद्यालय सोडावे लागेल. या संबंधी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना आहे.

६. मोफत शिक्षण सवलत मिळणाऱ्या अथवा सरकारची किंवा महाविद्यालयाची शिष्यवृत्ती धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील अटींचे पालन केलेच पाहिजे:

*अ) सदैव नियमित उपस्थिती*
*आ) समाधानकारक सद्‌वर्तन*
*इ) सर्व परीक्षांमध्ये किमान ५०% गुणांची प्राप्ती.*

७. विद्यापीठाच्या परीक्षेसाठी आवश्यक त्या उपस्थितीची अट विद्यार्थ्याने पूर्ण केली पाहिजे. सर्व विषयांच्या स्वाध्यायांना उपस्थित राहिले पाहिजे.

८. विद्यार्थ्याची मेडिकल तपासणी झाल्याशिवाय त्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे पाठविला जाणार नाही.

९. महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना विद्यार्थ्याने वाचल्या पाहिजेत. त्यासाठी दररोज सूचना फलक पाहण्याची सवय असावी. संबंधित सूचना पाहिली नव्हती अशी सबब कधीही चालणार नाही.

१०. आपल्या वर्तनाने कुठल्याही तऱ्हेचा उपद्रव कोणालाही होणार नाही याची खबरदारी विद्यार्थ्याने घेतली पाहिजे. **धुम्रपान, तंबाखू-गुटखा, इत्यादी व्यसने करणाऱ्यास कडक शिक्षा केली जाईल.**

११. विद्यार्थ्याने आपल्या विषयाखेरीज अन्य विषयांच्या तासिकांना संबंधित प्राध्यापकांच्या परवानगीशिवाय बसू नये.

१२. महाविद्यालयात असताना पोशाख, स्वच्छ, शालीन व नीटनेटका असावा.

१३. प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांशी बोलताना-वागताना विद्यार्थ्यांनी संयम व मर्यादा सोडू नये.

१४. महाविद्यालयाच्या कार्यालयातील किंवा ग्रंथालयातील लहान-मोठ्या कर्मचारी वर्गाशी विद्यार्थ्यांनी सौजन्याने वागले पाहिजे.

१५. वर्गात, ग्रंथालयात, आवारात, समारंभाच्या वेळी सभागृहात शांतता व सभ्यता राखावी.

१६. कोणत्याही विद्यार्थ्यास प्रक्षोभक किंवा हिंसक अशा कोणत्याही चळवळीत भाग घेऊ नये.

१७. विद्यार्थ्याने महाविद्यालयाशी संबंधित असलेली कोणतीही माहिती वृत्तपत्र किंवा इतर ठिकाणी मा.प्राचार्यांच्या पूर्व-परवानगीशिवाय प्रकाशित-प्रसारित करू नये.

१८. महाविद्यालयात कोणतेही मंडळ स्थापन करणे, वक्ता किंवा सभाध्यक्ष म्हणून निमंत्रण देण्यापूर्वी मा.प्राचार्यांच्या पूर्व-परवानगीची आवश्यकता राहील.

१९. ज्या बाबींचा समावेश वरील नियमांमध्ये करण्यात आलेला नाही त्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.प्राचार्यांना आहे.

२०. स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन या प्रकारच्या समारंभास उपस्थिती अनिवार्य आहे.

२१. ट्रान्स्फर सर्टिफिकेट (टीसी) मिळविण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याची प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य राहील.

२२. योग्य पुराव्यासह अर्ज केल्यावर जुनी कागदपत्रे (हवी असल्यास) किमान एक आठवड्याच्या कालावधीत मिळू शकतील.

**परिशिष्ट क्र.१**

शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून उमवि परिपत्रक क्र.४६/२०१० नुसार पदवी व पदव्युत्तर वर्गांना सत्र पद्धती सुरू करण्यात आली आहे.

**१) बी.ए. पदवी - प्रथम वर्ष कला :**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार प्रथम वर्ष कला वर्गातील विद्यार्थ्यांना एकूण सात (०७) विषय अभ्यासावे लागतात.

| गट | विषय |
|---|---|
| गट - क (सक्तीची भाषा) आवश्यक इंग्रजी | आवश्यक इंग्रजी |
| गट - ख (वैयक्तिक भाषा) मराठी<br>गट - ग हिंदी<br>गट - घ वैकल्पिक इंग्रजी | गट ख, ग, घ मधून कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त दोन भाषा. |
| इतर गट:<br>गट - अ : अर्थशास्त्र<br>गट - आ : राज्यशास्त्र<br>गट - इ : इतिहास<br>गट - ई : भूगोल<br>गट - उ : मानसशास्त्र | गट अ ते उ मधून कमीत कमी तीन आणि जास्तीत जास्त चार विषय. |

- प्रत्येक सत्रात ४० गुणांची लेखी परीक्षा आणि १० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन एकूण सहा विषयांचे असेल. या व्यतिरिक्त पर्यावरण अभ्यास हा विषय सक्तीचा आहे. (अंतर्गत मूल्यमापनाच्या चाचणी परीक्षेस हजेरी सक्तीची आहे. त्याशिवाय सत्रास मंजुरी मिळणार नाही.)
- साधारणतः एखाद्या विद्यार्थ्याने कला शाखेच्या प्रथम वर्षात घेतलेला विषय पुढे द्वितीय वर्ष अथवा तृतीय वर्षात गेल्यावर त्यास बदलता येणार नाही. तथापि एक विशेष सवलत म्हणून विशेष (स्पेशल) विषय म्हणून निवडण्याची परवानगी मिळू शकेल. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्ष कलाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असावा आणि त्याने द्वितीय वर्षात हा नवा विषय तृतीय वर्षाला जाण्यापूर्वी पूर्ण करायला हवा. तृतीय वर्षाला प्रवेशित झाल्यानंतर त्यास कोणताही विषय बदलता येत नाही.
- **द्वितीय वर्ष/तृतीय वर्ष कला** अभ्यासक्रमासाठी ज्यांना **इंग्रजी स्पेशल** विषयाची निवड करावयाची आहे, त्यांनी **प्रथम वर्षाला ऑप्शनल इंग्रजी** हा विषय घेणे आवश्यक आहे.

२) **बी.ए. पदवी - द्वितीय वर्ष कला :**

| गट/विषय | सामान्य स्तर | विशेष स्तर |
|---|---|---|
| गट - क | | |
| (सक्तीची भाषा) इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| गट - ख | | |
| (वैकल्पिक भाषा)<br>मराठी / हिंदी / इंग्रजी | प्रथमवर्ष अभ्यासक्रमासाठी निवडलेले विषय | अ)सामान्य स्तर प्रथमवर्ष अभ्यासक्रमासाठी निवडलेले तीन विषय |
| गट - अ : अर्थशास्त्र<br>गट - आ : राज्यशास्त्र<br>गट - इ : इतिहास<br>गट - ई : भूगोल<br>गट - उ : मानसशास्त्र | वर (अ) मध्ये निवडलेल्या अ ते उ विषयांपैकी विशेष स्तरासाठी दोन विषय निवडावे | |
| एकूण गुण ६०० | प्रत्येक सत्रात ४०+१० गुणांचे सहा विषय | |

याशिवाय विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान या आवश्यक विषयाचा अभ्यास द्वितीय/तृतीय वर्षास करावयाचा आहे.

३) **बी.ए. पदवी - तृतीय वर्ष कला :**

| गट/विषय | सामान्य स्तर | विशेष स्तर |
|---|---|---|
| गट - क<br>आवश्यक भाषा इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| गट - ख<br>(वैकल्पिक भाषा)<br>मराठी<br>हिंदी<br>इंग्रजी<br>गट अ ते उ | प्रथम वर्ष/द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रमासाठी निवडलेले विषय<br><br>द्वितीय वर्ष कला | अ) सामान्य स्तरः<br>द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रमासाठी निवडलेले विषय<br><br>ब) विशेष स्तर |
| अर्थशास्त्र<br>राज्यशास्त्र<br>इतिहास<br>भूगोल<br>मानसशास्त्र | अभ्यासक्रमातील ‘अ’ ते ‘उ’ गटातील निवडलेले विषय | द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रमासाठी निवडलेले विशेषस्तरावरील दोन विषय |
| एकूण गुण ६०० | प्रत्येक सत्रात ४०+१० गुणांचे सहा विषय | |

**४) बी.एस्सी. पदवी - प्रथम वर्ष विज्ञान :**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार प्रथम वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्र विषय आवश्यक राहील. खालीलपैकी कोणतेही चार विषय निवडावे:

| १) पर्यावरण शास्त्र | आवश्यक |
|---|---|
| २) गणित<br>३) संख्या शास्त्र<br>४) पदार्थ विज्ञान<br>५) रसायन शास्त्र<br>६) वनस्पती शास्त्र<br>७) प्राणी शास्त्र<br>८) भूगोल<br>९) सूक्ष्मजीव शास्त्र (मर्यादित जागा-मेरीटनुसार प्रवेश)<br>१०) संगणक शास्त्र (मर्यादित जागा-मेरीटनुसार प्रवेश)<br>११) इलेक्ट्रॉनिक्स (मर्यादित जागा-मेरीटनुसार प्रवेश)<br>१२) बायोटेक्नॉलॉजी (मर्यादित जागा-मेरीटनुसार प्रवेश) | २ ते १२ पैकी<br>ग्रुप नुसार (ए ग्रुप/बी ग्रुप)<br>ग्रुप मध्ये येणारे<br>कोणतेही चार विषय |

**५) बी.एस्सी. पदवी - द्वितीय वर्ष विज्ञान :**

द्वितीय वर्ष विज्ञानच्या विद्यार्थ्याने प्रथम वर्षाच्या चार विषयांपैकी तीन विषय घ्यावे. इंग्रजी/मराठी पैकी एक आणि सामान्य ज्ञान हे विषय सक्तीचे राहतील.

**६) बी.एस्सी. पदवी - तृतीय वर्ष विज्ञान :**

तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने द्वितीय वर्ष विज्ञानच्या तीन विषयांपैकी एक प्रमुख विषय घ्यावा.

**७) बी.कॉम. पदवी :**

बी.कॉम. पदवीसाठी प्रथम वर्षात एकूण सात व पर्यावरण शास्त्र, द्वितीय वर्षात सामान्य विज्ञान व तृतीय वर्षात प्रत्येकी आठ असे प्रवेश अर्जात दाखविल्याप्रमाणे विषय घ्यावे लागतील.

***प्रत्येक शाखेच्या विद्यार्थ्याने प्रथम वर्षी घेतलेल्या विषयातूनच द्वितीय किंवा तृतीय वर्षासाठी स्पेशल विषयाची निवड करावी.***

# परिशिष्ट - २

- पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेण्यासाठी यापूर्वी रॅगींग न केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयात एम.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. या पदव्युत्तर वर्गांची विना अनुदानित तत्त्वावर सोय उपलब्ध आहे.

| अभ्यासक्रम | उपलब्ध विषय |
|---|---|
| एम.ए. | १) हिंदी<br>२) मराठी<br>३) इंग्रजी<br>४) अर्थशास्त्र<br>५) भूगोल |
| एम.एस्सी. | १) रसायनशास्त्र (ऑरगॅनिक केमेस्ट्री)<br>२) वनस्पतीशास्त्र (प्लॅन्ट फिजिऑलॉजी)<br>३) प्राणीशास्त्र (एन्टेमॉलॉजी)<br>४) पदार्थविज्ञान<br>५) सूक्ष्मजीवशास्त्र<br>६) संगणकशास्त्र |
| एम.कॉम. | आवश्यक विषय आणि ॲडव्हान्सड् अकौन्टींग व ऑडिटींग |

- एम.फिल. व पी-एच.डी. या संशोधनपर पदव्यांसाठी इंग्रजी, हिंदी, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, प्राणीशास्त्र यांच्या मार्गदर्शनाची सोय महाविद्यालयात उपलब्ध आहे. संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाचे ग्रंथालय व विद्यापीठ मान्यताप्राप्त प्रयोगशाळा अद्ययावत साधनांनी सुसज्ज आहेत.
- संशोधनासाठी पुढील मान्यताप्राप्त मार्गदर्शक महाविद्यालयात उपलब्ध आहेत:
  हिंदी: प्राचार्य डॉ.विश्वास पाटील, इंग्रजी: डॉ. डी. के. सोनार, प्राणीशास्त्र: डॉ. ए. एस. पाटील, भौतिकशास्त्र:डॉ.आर.एस.पाटील, इंग्रजी:डॉ.एस्.डी.सिंदखेडकर, वनस्पतीशास्त्र:डॉ.एस.के.तायडे, सूक्ष्मजीवशास्त्र: डॉ.ए.एच. जोबनपुत्र व डॉ.आर.झेड.सैयद, भूगोल: डॉ.यू.व्ही.निळे.

**शुल्कासंबंधी सूचना:**

१. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयातर्फे शुल्क आकारले जाते. महाविद्यालयाचे वर्ष दोन सत्रांचे असते. महाविद्यालयात प्रवेश घेताना संपूर्ण फी जमा करावी.
२. प्रवेश घेतल्यानंतर सत्र संपण्यापूर्वी जर महाविद्यालय सोडले तर त्या सत्राची संपूर्ण फी महाविद्यालयात जमा होईल. एकदा भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत मिळत नाही.
३. बोनाफाईड किंवा अन्य प्रमाणपत्रांकरिता ₹ २०/- शुल्क आकारले जाते.
४. ओबीसी,एन.टी./व्ही.जे.,एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ₹१,००,०००/- च्या आत असेल ते विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र असतील; अशा विद्यार्थ्यांनी नियमित हजर राहिलेच पाहिजे. गैरहजेरीमुळे शासनाकडून सरकारी सवलतीची फी महाविद्यालयाकडे न मिळाल्यास विद्यार्थ्याला स्वत: सदर शुल्क भरावे लागेल.
५. एस.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ₹२,००,०००/- च्या आत असेल ते विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र असतील; अशा विद्यार्थ्यांनी नियमित हजर राहिलेच पाहिजे. गैरहजेरीमुळे शासनाकडून सरकारी सवलतीची फी महाविद्यालयाकडे न मिळाल्यास विद्यार्थ्याला स्वत: सदर शुल्क भरावे लागेल.
६. सतत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे पाठविला जाणार नाही. टर्म मंजूर होणार नाही व त्यास परीक्षेला बसता येणार नाही.

**शुल्क परताव्याचे नियम :**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिपत्रक १२६/२००३ आणि १४३/२००३ नुसार शुल्क परताव्या बाबतची विहित नियमावली पुढील प्रमाणे आहे:

- प्रवेशापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्क परत केले जाते.
- प्रवेशापासून १६ ते ३० दिवसांच्या आत २०% रक्कम वजा करून उर्वरित शुल्क परत केले जाते.
- प्रवेशापासून ३० दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कोणतेही शुल्क परत केले जात नाही.

## महाविद्यालयात विविध वर्गांना प्रवेश घेताना भरावयाच्या शुल्काचा तक्ता

| अ. क्र. | शुल्काचा तपशील | प्रथम वर्ष | | | द्वितीय वर्ष | | | तृतीय वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान |
| १. | प्रवेश शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| २. | शिक्षण शुल्क | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० |
| ३. | ग्रंथालय शुल्क | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ |
| ४. | वैद्यकीय शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ५. | जिमखाना शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ६. | अंतर्गत परीक्षा शुल्क | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| ७. | आपत्कालीन व्यवस्थापन शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ८. | वार्षिक नियतकालिक शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| ९. | प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान) | -- | -- | ६०० | -- | -- | ७०० | १५० (भूगोल) | -- | ८०० |
| १०. | महाविद्यालय विकास निधी | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| ११. | विद्यार्थी उपक्रम शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| १२. | गरीब विद्यार्थी सहायता शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| १३. | ग्रंथालय अनामत | १०० | १०० | १०० | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १४. | प्रयोगशाळा अनामत | -- | -- | १५० | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १५. | अश्वमेध शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| १६. | संगणकीकरण शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० |
| १७. | विद्यार्थी समुह विमा | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ |
| १८. | ई-सुविधा फी | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| १९. | ओळखपत्र शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २०. | व्यक्तिमत्त्व विकास व रोजगार मार्गदर्शन शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| २१. | पात्रता शुल्क | ५० | ५० | ५० | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २२. | पर्यावरण अभ्यास शुल्क | १०० | १०० | १०० | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २३. | सामान्य ज्ञान शुल्क | -- | -- | -- | ५० | ५० | ५० | -- | -- | -- |
| २४. | किरकोळ शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| २५. | नोंदणी फी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | एकूण रु. | **१८३०** | **१८३०** | **२५८०** | **१६३०** | **१६३०** | **२३३०** | **१७३०** | **१५८०** | **२३८०** |

- राज्याबाहेरील व इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांना पात्रता शुल्क रु.१२०/- असेल.
- अनुसूचित जमाती (एस.टी.) संवर्गातील विद्यार्थ्यांना फक्त खालीलप्रमाणे शुल्क भरून प्रवेश मिळेल.

  १. ग्रंथालय अनामत : रु.१००/-(फक्त प्रथम वर्षासाठी),

  २. प्रयोगशाळा अनामत : रु.१५०/-(फक्त प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठी),

  ३. ओळखपत्र शुल्क : रु.१०/- (सर्व वर्गांसाठी)

# ई-सुविधा माझी सुविधा, ईझी सुविधा!

1990
Grade-B(2.88)
NAAC Re-Accredited
ISO 9001:2008




विद्यार्थी मित्रहो,

कॉलेजच्या सुरवातीपासून ते शेवटपर्यंत अनेक कार्यालयीन कामाशी तुमचा संबंध येतो. ज्यामध्ये ॲडमिशनचे फॉर्म्स, एलिजिबिलिटी फॉर्म्स, टाइम-टेबल, हॉल-तिकीट, डिग्री सर्टिफिकेटस अशा अनेक गोष्टी वारंवार कॉलेज अथवा युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन कराव्या लागतात. या कामांसाठी विद्यार्थी व कॉलेजला लागणारा वेळ, पैसा आणि परिश्रम यांची बचत करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुविधा घरबसल्या कमी वेळेत पोहचविण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ तर्फे ''ई-सुविधा'' हा उपक्रम एमकेसिएलच्या सहकार्याने सुरु करण्यात आला आहे. या ''ई-सुविधा'' उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी खालील पद्धतीने सहभागी व्हा.

आपला १६ अंकी पीआरएन (PRN) / DUPin कॉलेजमधून मिळवा.
इंटरनेटचा वापर करून http://nmuj.digitaluniversity.ac
या साइटवर आपले ''ई-सुविधा'' अकाउंट ॲक्टिव्हेट करा.

आणि कॉलेज-युनिव्हर्सिटीच्या कागदपत्रांचे
सर्व व्यवहार करा आता एका क्लिकवर !



| अनु.क्र. | सुविधा | फायदे |
|---|---|---|
| १ | कॉलेज मध्ये नोंदविलेल्या नावातील स्पेलिंगच्या चुका सुधारण्यासाठी विनंती करा व त्याचे स्टेटस जाणून घ्या. | बदल करण्यासाठी कुठल्याही (फिजीकल) फॉर्म भरण्याची किंवा विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| २ | तुमचा मोबाईल नंबर व वैयक्तीक माहिती अपडेट करा. | विद्यापीठातून निकाल, परीक्षेचे वेळापत्रक असे **SMS** अलर्ट मिळवा. |
| ३ | निवडलेल्या विषयांचा अभ्यासक्रम (Syllabus) डाउनलोड करा. | योग्य अभ्यासक्रम योग्य वेळेत मिळवा. |
| ४ | जुन्या प्रश्नपत्रिका डाउनलोड करा | प्रश्न पत्रिका सोडवा व आत्मविश्वास वाढवा. |
| ५ | तुमचे इलिजिबिलिटी (पात्रता) स्टेटस तपासा. | विद्यापीठास नेमके कोणते कागदपत्र हवे आहेत, त्याची माहिती मिळवा. |
| ६ | परीक्षेसंबंधी तारखांबद्दल माहिती मिळवा. | आता परीक्षा फॉर्म भरताना लेट फी किंवा फॉर्मची तारीख चुकण्याची काळजी करू नका. |
| ७ | तुमच्या विषयांचे पूर्व नियोजन करण्यासाठी परीक्षेचे व्यक्तिगत वेळापत्रक डाउनलोड करा. | आता लांबलचक यादीतून वेळापत्रक उतरवून घेण्यासाठी नोटीस बोर्डजवळ गर्दी करायला नको. |
| ८ | सिस्टिम जनरेटेड प्री-फिल्ड एक्झाम फॉर्म्स | अर्ज घेण्याकरिता तात्कळत राहण्याची, किंवा हाताने भरण्याची गरज नाही. अर्जावर सही करून कॉलेजमध्ये फी भरा. |
| ९ | व्यक्तिगत परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) मिळवा. | प्रत्येक पेपरची तारीख, परीक्षा केंद्राचा पत्ता व वेळ जाणून घ्या. |
| १० | पुर्न: मुल्यांकन (Revaluation) चा किंवा पुर्न: परीक्षेचा अर्ज मिळवा. | या करता विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| ११ | ईझी - **EASY** (Employment Assistance Services to Youth)- शिष्यवृत्ती योजना. | शंभरावर शिष्यवृत्ती योजनांपैकी तुम्हाला सर्वाधिक सोयीच्या असलेल्या शिष्यवृत्ती निवडा आणि अर्ज करा. |
| १२ | ईझी - व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रमाणपत्रांची माहिती. | एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध. |
| १३ | ईझी - कमवा आणि शिका. | सुट्टीच्या दिवसांत कामाच्या अनुभवासह पॉकेट मनी कमविण्याची संधी, तीही तुमच्याच शहरात. |
| १४ | ईझी - नोकरीचा शोध. | हजारो नोकऱ्यांच्या पर्यायांतून तुमच्या शिक्षणाला साजेशी नोकरी शोधा. |
| १५ | ईझी - दिनदर्शिका. | देशभरात होणाऱ्या जॉब फेअर्सना हजेरी लावा. |
| १६ | ईझी - स्पर्धा परीक्षा. | विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शन मिळवा. |
| १७ | बँकेत खाते उघडणे, ड्रायव्हिंग लायसेन्स काढणे, पासपोर्ट काढणे इ. साठीच्या वेब साईटच्या लिंक्स. | भारताचे जागरूक व स्वयं प्रेरित नागरिक व्हा. |
| १८ | ब्लॉग्ज. | मित्राबरोबर शेअर करा. |
| १९ | आणि इतरही बरेच काही... | तुमचे लॉग इन ॲक्टिव्हेट करण्यासाठी **http://nmuj.digitaluniversity.ac** या वेब साईटला आजच भेट द्या आणि ई-सुविधा सोबत ईझी सुविधा मिळवा, सर्वांच्या पुढे रहा ! |




MKCL's Digital University®
Empower Students Digitally!

अधिक माहितीसाठी संपर्क
ई-सुविधा - विद्यार्थी सहाय्यता केंद्र (SFC)
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
☎: ०२५७-२२५८४१८
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

For more Information Contact to
e-Suvidha - Student Facilitation Center (SFC)
North Maharashtra University, Jalgaon
☎: 0257-2258418
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

# विद्यार्थ्यांसाठी विविध योजना



### कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना :-

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी आहे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे.स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आदि मुख्य उद्देश योजनेचे आहेत. योजनेत विद्यार्थ्याने अध्ययनाच्या वेळेव्यतिरिक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षीत आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

### साहस कार्यशाळा :-

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती निर्माण होणेविषयी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटाना धैर्याने सामोरे जाणे मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोपवे, पुल बांधणी, रस्ता दुरुस्ती, दिशा ओळख, आकाश निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रतीकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभागी होवू शकतात.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना :-

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित व विद्यापीठाच्या वसतिगृहात निवासित विद्यार्थ्यापैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिकसहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

### उमवि संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा :-

विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृध्दिंगत करणेसाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांसाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी, पी.एस.आय., तहसीलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

### उमवि विद्यार्थी दत्तक योजना :-

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणा-या गरजू व होतकरु विद्यार्थ्यासाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थिनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

### विद्यार्थी संशोधन योजना :-

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे मागे राहू नये या साठी संशोधक विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाद्वारे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नीत महाविद्यालये यांचेसाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधन प्रोत्साहन योजना, मा. कुलगुरु प्रायोजित विशेष संशोधन योजना विज्ञान व तंत्रज्ञान विषयात विशेष कार्य करणा-या विद्यार्थ्यास जी. एच. रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रु. ७,०००/- ते रु. १०,०००/- पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

### सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन :-

विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, नाट्य, सुत्रसंचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

### युवती सभा कार्यशाळा :-

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींकरीता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरुपाच्या उपक्रमांचे आयोजन करणेकरीता युवती सभा अंतर्गत स्वंयसिध्दा - अभियान व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनी सहभागी होवू शकतात.

### एकलव्य विद्याधन कर्ज योजना :-

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणा-या खर्चाच्या ७० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यास प्रवेशित काळात शासकीय/ निमशासकीय/सहाकारी संस्था/बँका यांच्या कडून कोणतेही विद्यावेतन/ शिष्यवृत्ती मिळत नसेल, असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

### मा. कुलगुरु वैद्यकीय निधी योजना :-

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती/नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु. ५,०००/- मृत विद्यार्थ्याच्या पालकास मा.कुलगुरु वैद्यकीय निधीतून देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करुन सहाय्य करण्यात येते.

**टिप: विद्यापीठ निधी आणि मा. कुलगुरु निधीतून राबविल्या जाणा-या विद्यार्थी कल्याणकारी योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे.**

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Grade - B (2.88)
NAAC Re-Accredited

संपर्क :- विद्यार्थी कल्याण विभाग, उ.म.वि., जळगाव, ०२५७-२२५७४१८,४१९

अधिक माहिती साठी संपर्क :-आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी

# अभ्यास व अभ्यासेतर उपक्रमांचे सन २०१२-१३ चे वार्षिक नियोजन

| अ.क्र. | दिवस/दिनांक/आठवडा | उपक्रम |
|---|---|---|
| १. | ११ जून २०१२ | पूज्य साने गुरुजी पुण्य स्मरण |
| २. | १५ जून २०१२ | महाविद्यालय प्रथम सत्र सुरुवात |
| ३. | १५ जून २०१२ | प्राध्यापकांची बैठक सकाळी ११.०० वा. |
| ४. | तिसरा आठवडा | विभागीय बैठक - वार्षिक नियोजन |
| ५. | जून २०१२ | प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या वर्गांची सुरुवात |
| ६. | पहिला आठवडा, जुलै २०१२ | द्वितीय व तृतीय वर्ष वर्गांच्या अभ्यासक्रमाची सुरुवात |
| ७. | पहिला आठवडा, जुलै २०१२ | महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन समिती बैठक |
| ८. | पहिला आठवडा, जुलै २०१२ | नवागत विद्यार्थ्यांसाठी मा.प्राचार्यांचे अभिभाषण |
| ९. | पहिला आठवडा, जुलै २०१२ | नवागत विद्यार्थिनींसाठी मा.प्राचार्यांचे अभिभाषण |
| १०. | पहिला आठवडा, जुलै २०१२ | पदव्युत्तर वर्गाची सुरुवात |
| ११. | दुसरा आठवडा, जुलै २०१२ | विविध मंडळांच्या कार्याध्यक्षांची मा.प्राचार्यांच्या समवेत बैठक |
| १२. | दुसरा आठवडा, जुलै २०१२ | ग्रंथालय सल्लागार समिती बैठक |
| १३. | तिसरा आठवडा, जुलै २०१२<br>पहिला आठवडा,ऑगस्ट २०१२ | परीक्षा समितीची विभागीय बैठक (परीक्षा निकाल विश्लेषण)<br>विद्यापीठ आदेशान्वये विद्यार्थी मंडळाची निवड |
| १४. | पहिला आठवडा,ऑगस्ट २०१२ | विविध मंडळांची उद्‌घाटने |
| १५. | दुसरा आठवडा,ऑगस्ट २०१२ | विविध मंडळांची उद्‌घाटने |
| १६. | १५ ऑगस्ट २०१२ | भारतीय स्वातंत्र्य वर्धापन दिन |
| १७. | तिसरा आठवडा,ऑगस्ट २०१२ | वैद्यकीय तपासणी शिबीर |
| १८. | चौथा आठवडा,ऑगस्ट २०१२ | उर्वरित मंडळांची उद्‌घाटने |
| १९. | पहिला आठवडा,सप्टेंबर २०१२ | विद्यार्थी मंडळ शपथ विधी |
| २०. | पहिला आठवडा,सप्टेंबर २०१२ | विद्यार्थी नवलेखन शिबीर |
| २१. | ५ सप्टेंबर २०१२ | शिक्षक दिन |
| २२. | दुसरा आठवडा, सप्टेंबर २०१२ | यूजीसीच्या विविध योजनांतर्गत कार्यक्रम |
| २३. | दुसरा आठवडा, सप्टेंबर २०१२ | विविध मंडळांचे शैक्षणिक/शिक्षणेतर उपक्रमांचे आयोजन |
| २४. | १४ सप्टेंबर २०१२ | हिंदी दिन |
| २५. | तिसरा आठवडा, सप्टेंबर २०१२ | यूजीसीच्या/विद्यापीठ विविध योजने अंतर्गत उपक्रम |
| २६. | तिसरा आठवडा, सप्टेंबर २०१२ | विद्यार्थ्यांकडून फीड बॅक फॉर्म भरून घेणे |
| २७. | चौथा आठवडा, सप्टेंबर २०१२ | अंतर्गत घटक चाचण्या |
| २८. | २४ सप्टेंबर २०१२ | राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन व विद्यार्थी प्रशिक्षण शिबीर |
| २९. | चौथा आठवडा, सप्टेंबर २०१२ | महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान |
| ३०. | चौथा आठवडा, सप्टेंबर २०१२ | योग प्रशिक्षण शिबीर |
| ३१. | २ ते ९ ऑक्टोबर २०१२ | महात्मा गांधी विचार मंथन सप्ताह |
| ३२. | ९ ऑक्टोबर २०१२ | महात्मा गांधी विचार मंथन व किसान दिन(पुरुषोत्तम पारितोषिक वितरण समारंभ) |
| ३३. | दुसरा आठवडा, ऑक्टोबर २०१२ | एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. सत्रांत अंतर्गत परीक्षा |
| ३४. | ११ ऑक्टोबर २०१२ | परीक्षा समितीची बैठक |
| ३५. | १५ ऑक्टोबर २०१२ | सत्रांत परीक्षा |
| ३६. | २० ऑक्टोबर २०१२ | विविध मंडळांचे शैक्षणिक व शिक्षणेतर उपक्रमांचे आयोजन |

| | | |
|---|---|---|
| ३७. | तिसरा आठवडा,ऑक्टोबर २०१२ | महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन समिती बैठक |
| ३८. | तिसरा आठवडा,ऑक्टोबर २०१२ | महाविद्यालय सत्रांत परीक्षा |
| ३९. | चौथा आठवडा,ऑक्टोबर २०१२ | प्राध्यापकांची सत्रांत बैठक |
| ४०. | नोव्हेंबर २०१२ | दीपावली सुट्टी |
| ४१. | नोव्हेंबर २०१२ | द्वितीय सत्रारंभ प्राध्यापकांची बैठक |
| ४२. | पहिला आठवडा,डिसेंबर २०१२ | महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन समिती बैठक |
| ४३. | पहिला आठवडा,डिसेंबर २०१२ | राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीर |
| ४४. | दुसरा आठवडा,डिसेंबर २०१२ | महाविद्यालय शाळा समुह योजना बैठक |
| ४५. | २४ डिसेंबर २०१२ | पूज्य साने गुरुजी जयंती |
| ४६. | पहिला आठवडा,जानेवारी २०१३ | विविध विषयांच्या तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे व कार्यशाळा |
| ४७. | पहिला आठवडा,जानेवारी २०१३ | अंतर्गत घटक चाचण्या |
| ४८. | १० जानेवारी २०१३ | भूगोल दिन |
| ४९. | २६ जानेवारी २०१३ | प्रजासत्ताक दिन समारंभ |
| ५०. | चौथा आठवडा,जानेवारी २०१३ | वार्षिक स्नेह सम्मेलन |
| ५१. | तिसरा आठवडा, फेब्रुवारी २०१३ | अंतर्गत घटक चाचण्या |
| ५२. | २८ फेब्रुवारी २०१३ | राष्ट्रीय विज्ञान दिन |
| ५३. | पहिला आठवडा मार्च २०१३ | महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन समिती बैठक |
| ५४. | दुसरा आठवडा मार्च २०१३ | एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. सत्रांत परीक्षा |
| ५५. | तिसरा आठवडा, मार्च २०१३ | विद्यापीठ परीक्षा आरंभ |
| ५६. | मार्च, एप्रील व मे २०१३ | विद्यापीठ परीक्षा व एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. अंतर्गत परीक्षा |
| ५७. | ३० एप्रील २०१३ | शैक्षणिक वर्ष अखेर बैठक |

सूचना:

- वर नमूद केलेल्या उपक्रमांच्या तारखांमध्ये विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार तसेच इतर कारणास्तव प्राचार्यांच्या अधिकारात काही बदल होऊ शकतील.
- विद्यापीठ निकाल लागल्यानंतर प्रवेश प्रक्रिया लगेच दुसऱ्या दिवसापासून सुरू होईल.
- सत्रारंभापासून अकरावी वर्गाच्या तासिका सुरू होतील.

---

**सर्व धर्म प्रार्थना**

*ओम तत् सत् श्री नारायण तू पुरुषोत्तम गुरू तू*
*सिध्द बुध्द तू स्कंद विनायक सविता पावक तू*
*ब्रह्म मज्द तू यह्व शक्ती तू ईशू पिता प्रभू तू*
*रूद्र विष्णू तू राम कृष्ण तू रहीम ताओ तू*
*वासुदेव गो विश्व रूप तू चिदानंद हरी तू*
*अद्वितीय तू अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू*
*ओम शांती: शांती: शांती: ।।*

## वरिष्ठ महाविद्यालय : प्राचार्य व प्राध्यापक - विज्ञान शाखा

### रसायनशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा. एस. बी. पाटील, उपप्राचार्य व विभाग प्रमुख | एम.एस्सी., एम.फिल. |
| २ | प्रा.आय. बी. चौधरी | एम.एस्सी., एम.फिल. |
| ३ | प्रा.यू. एम.जाधव | एम.एस्सी., एम.फिल. |
| ४ | प्रा.एम. के. पटेल | एम.एस्सी., एम.फिल. |
| ५ | प्रा.एम. एम.पाटील | एम.एस्सी., नेट |
| ६ | प्रा.डॉ. ए. जी. बेलदार | एम.एस्सी., पी-एच.डी., नेट |
| ७ | प्रा.आर. व्ही. पाटील | एम.एस्सी., नेट |
| ८ | प्रा.जे. यू. चव्हाण | एम.एस्सी., नेट |
| ९ | प्रा. एस. आर. उजगरे | एम.एस्सी., नेट |

### भौतिकशास्त्र, संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ. आर. एस. पाटील, विभाग प्रमुख | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| २ | प्रा.डॉ. आय. जे. पाटील | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| ३ | प्रा.डॉ. जे. बी. चौधरी | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| ४ | प्रा. पी. पी. जगताप | एम.एस्सी., एम.फिल. |

### सूक्ष्मजीवशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ. ए. एच.जोबनपुत्र, विभाग प्रमुख | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| २ | प्रा. व्ही. एम. चौधरी | एम.एस्सी., सेट |
| ३ | प्रा.डॉ. एम. एम. जोगी | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| ४ | प्रा.डॉ.आर. झेड. सैयद | एम.एस्सी., पी-एच.डी. |

### प्राणीशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ. आर. एम. चौधरी, विभाग प्रमुख | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| २ | प्रा.डॉ. एस. एस. भांडे | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| ३ | प्रा. एस. एस. साने | एम.एस्सी., एम.फिल. |
| ४ | प्रा. एस. पी. फुलपगारे | एम.एस्सी., एम.फिल. |

### गणित व संख्याशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.सी. एम. चौधरी, विभाग प्रमुख | एम.एस्सी., एम.फिल. |
| २ | प्रा.आर. बी. पटेल | एम.एस्सी., एम.फिल.,डी.एच.ई. |

### वनस्पतीशास्त्र विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. एस. के. तायडे, विभाग प्रमुख | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| २ | प्रा. डॉ. एस. एस. पाठक | एम.एस्सी., पी-एच.डी. |
| ३ | प्रा. एन. के. आठवले | एम.एस्सी., नेट |
| ४ | प्रा. कु. व्ही. के. पाटील | एम.एस्सी., नेट |